# जिल्हा परिषद, नागपूर

## जाहिरात क्रमांक २ /२०१९

### अनुसुचित जमातीसाठी राखीव असलेले पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम

**(सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद नागपूर जाहीरात क्र./जिपना/साप्रवि/स्था -३ / ससेभ/सी.आर -४७/ ४५४५ /२०१९ , दि.२७.१२.२०१९ )**

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दिनांक २१.१२.२०१९ नुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या व त्यानंतर विशेष मागास प्रवर्गाचे अथवा कोणत्याही मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केलेले असल्यास व अनुसूचित जमातीचा दावा सोडुन दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची जागा रिक्त दर्शवुन त्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर दर्शवावयाचे आहे. तर त्यांना अधिसंख्य दर्शविल्यानंतर रिक्त झालेल्या जागाकरीता निश्चित केलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार विशेष भरती मोहीमेतंर्गत पदभरती करावयाची आहे.

सदर भरती प्रक्रीया राबविण्याबाबत ग्राम विकास विभागाचे शासन पत्र क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.२२६/भाग २/ आस्था ८ दि. २३.१२.२०१९ अन्वये वर नमुद शासन निर्णयान्वये सुनिश्चित केलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार जिल्हा परिषदेतंर्गत भरती प्रक्रीया राबविण्याबाबत निर्देशित केलेले आहे. सदर भरती प्रक्रीयेबाबत सम विभागाचे शासन पत्र दिनांक २४.१२.२०१९ सोबत समविभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.२२६/भाग २/ आस्था ८ दि. २४.१२.२०१९ निर्गमित केलेला असुन त्यामध्ये या भरती प्रक्रीयेकरीता अल्पावधीचा कालबध्द कार्यक्रम विचारात घेवुन ऑनलाईन भरती प्रक्रीयेऐवजी ऑफलाईन भरती प्रक्रीया राबविण्याबाबत जाणीवपुर्वक धोरणात्मक निर्णय घेवुन यापुर्वीचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. प्रानिम १२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३अ दि.१३.०६.२०१८ मार्गदर्शक सुचनेनुसार भरती प्रक्रीया राबविण्याबाबत सुचीत केलेले आहे.

उपरोक्त नमुद सर्व बाबी विचारात घेवुन जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत पंचायत विभाग, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, पशुसंवर्धन विभाग, शिक्षण विभाग (प्राथमिक) यांचे आस्थापनेवरील खालील नमूद गट क ची वरीलपमाणे अनुसूचित जमातीचे प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना अधिसंख्य दर्शविल्यानंतर रिक्त झालेली पदे सरळ सेवेने भरण्याकरीता अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक पात्र उमेदवारांकडुन खालीलप्रमाणे नमुद वेळापत्रकानुसार सोबतच्या विहीत नमुण्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत. सदर्हु अर्ज उक्त नियोजीत दिनांका पर्यंतच या कार्यालयात पोहचतील याची उमेदवाराने दक्षता घ्यावी. विहीत कालावधीनंतर तथा टपालाच्या विलंबाने आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकृत केले जाणार नाही. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**भरती प्रक्रीयेबाबत नियोजित वेळापत्रक**

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याची तारीख | **मंगळवार दिनांक ३१.१२.२०१९ सकाळी १०.०० पासुन** |
| अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | **सोमवार दिनांक ०६.०१.२०२० सायं ५.४५ पर्यंत** |
| अर्ज सादर करण्याचे स्थळ | **जिल्हा परिषद, नागपुर (संबधित विभाग) जुने सचिवालय बिल्डींग जवळ, सिव्हील लाईन नागपुर ४४०००१** |
| परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्याची तारीख | **लेखी परिक्षेच्या दोन दिवसापुर्वी** |
| परिक्षेचे आयोजन | **दिनांक ०९.०१.२०२० ते १३.०१.२०२०** |
| प्रश्नपत्रिकेची उत्तरतालीका प्रसिध्द करणे | **परिक्षेच्या दिवशी सायं ५.३० वाजता** |
| उत्तर तालीकेवर आक्षेप स्विकारणे | **लेखी परिक्षेच्या लगतचा दिवस सायं ५.४५ पर्यंत** |
| लेखी परिक्षेतील प्राप्त गुणाची यादी प्रसिध्द करण्याची तारीख | **लेखी परिक्षेपासुन तिसऱ्या दिवशी सायं ५.४५ पर्यंत** |
| मुळ दस्ताऐवज पडताळणीसाठी पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द करणे | **दिनांक १६.०१.२०२०** |
| पात्रा उमेदवारांच्या कागदपत्राची तपासणी | **दिनांक १७.०१.२०२० ते १८.०१.२०२०** |
| हेल्पलाईन क्रमांक (कार्यालयीन दिवशी कार्यान्वीत राहतील) | **०७१२-२५६५१४५** |

**सुचना :**

१. अर्ज सादर करणाऱ्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेकरीता मुळ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देण्यात येईल. अंतिम निवड ही मुळ प्रमाणपत्र पडताळणी व लेखी परिक्षेतील गुण या आधारे केली जाईल. (शिक्षक संवर्गाचे पदे वगळुन)
२. परिक्षेला येतांना प्रवेशपत्रासोबत स्वतःचे छायाचित्र असलेले शासन मान्य ओळखपत्र सोबत आणने अनिवार्य आहे. त्याशिवाय परिक्षेला प्रवेश दिला जाणार नाही.
३. उत्तर पत्रिका लिहतांना काळया बॉलपेनचाच वापर करावा.
४. उमेदवारास एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्यानुसार प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज परिक्षा शुल्क डीमांड ड्रॉफ्ट (धनाकर्ष) सह सादर करणे आवश्यक राहील.
५. सादर केलेल्या अर्जाची व परिक्षा प्रवेशपत्राची प्रत उमेदवाराने भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यत स्वतःजवळ जपून ठेवणे ही त्याची वैयक्तीक जबाबदारी राहील. त्यांना विभागाकडून उक्त अर्जाची व परिक्षा प्रवेशपत्राची प्रत वेगळयाने उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

## १. उपलब्ध पदे :

| अ. क्र. | पदाचे नाव व वेतन स्तर | प्रवर्ग | एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प-ग्रस्त | भूकंप ग्रस्त | पदवीधर अंशकालीन | अनाथ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | ग्रामसेवक (कंत्राटी) | अ.ज. | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | रु.६०००/- मानधन तत्वावर | **एकुण** | **४** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| २ | औषध निर्मान अधिकारी | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एस - १० रु. २९२००-९२३००/- | **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एस - ८ रु. २५५००-८११००/- | **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एस - ८ रु. २५५००-८११००/- | **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ५ | शिक्षण सेवक प्राथ (वर्ग १ ते ४/५) | अ.ज. | १५५ | ४७ | २३ | ८ | ८ | ३ | १६ | २ | ४८ |
| | रु.६०००/- मानधन तत्वावर | **एकुण** | **१५५** | **४७** | **२३** | **८** | **८** | **३** | **१६** | **२** | **४८** |
| | | उपरोक्त पदापैकी निःसमर्थ असलेली व्यक्ती २ पदे अल्पदृष्टी, २ पदे कर्णबधिर व २ पदे अस्थिव्यंग क रीता असे एकुण ६ पदे राखीव. | | | | | | | | | |
| ६ | शिक्षण सेवक निम्न श्रेणी माध्य | अ.ज. | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | (वर्ग -५) रु.६०००/- मानधन तत्वावर | **एकुण** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ७ | शिक्षण सेवक माध्य (विषय -गणित | अ.ज. | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | /विज्ञान) (वर्ग ९/१०) रु.८०००/- मानधन | **एकुण** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ८ | शिक्षण सेवक उच्च माध्यमिक (वर्ग | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | ११ /१२)अर्थशास्त्र रु.९०००/- मानधन | **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एस - ८ रु. २५५००-८११००/- | **एकुण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |

## २. शैक्षणिक अर्हता :

उपरोक्त पदांकरीता आवश्यक असलेली खालील शैक्षणिक अर्हता अर्ज करते वेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | **ग्रामसेवक ( कंत्राटी)** | किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता आणि कृषी विषयाची पदविका २ वर्षाचा अभ्यासक्रम धारण करीत असतील मात्र कृषी विषयाची पदवी किंवा उच्च अहर्ता धारण करणा-या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. किंवा किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य अहर्ता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रीकी पदविका(तिन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यु),आणि संगणक हाताळणी /वापराबाबत माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उर्त्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.माहिती तंत्रज्ञान संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |
| २ | **औषध निर्मान अधिकारी** | **१.** माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>**२.** डिप्लोमा इन फार्मसी (डी.फॉर्म.) उत्तीर्ण आवश्यक तसेच औषध निर्माता अधिनियम १९४८ डिप्लोमा इन फार्मसी महाराष्ट्र स्टेट मुबई यांच्याकडील नोंदणीकृत असावा.किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवातुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि रुग्नालयात किंवा दवाखान्यातऔषध मिश्रणाच्या कामावर असलेले किंवा जेथे वैद्यक व्यवसायीच्या औषधपत्रानुसार नियमितपणे औषधे दिली जातात अशा ठिकाणी ज्यांना ७ वर्षापेक्षा कमी नसलेला ईतका अनुभव असेल किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि राज्य सरकारच्या रुग्नालयातील दवाखाना सहाय्यकांच्या पदाचा ५ वर्षाचा अनुभव असेल. |
| ३ | **आरोग्य सेवक (पुरुष)** | भौतिकशास्त्र ,रसायनशास्त्र व जिवशास्त्र या विषयासह माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. |

| | | |
|---|---|---|
| ४ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा संविधीमान्य तत्सम खालील पाठयक्रम<br>**१.** स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एक वर्षाचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा<br>**२.** आर्कीट्रेक्चरल ड्राफ्टसमन (वास्तुशात्स्त्रीय आरेखक) किंवा<br>**३.** कंन्स्ट्रक्शन सुपरवाईजर (बांधकाम पर्यवेक्षक)<br>**४.** आरेखक (स्थापत्य)<br>**५.** सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र किंवा स्थापत्य अभियांत्रीकीमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी (स्थापत्य) मध्ये धारण करीत असणारे उमेदवार पात्र असतील परंतु परंतु ज्यांनी सन १९८०-८१ ते १९८६-८७ दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकिय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे, अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकिय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधिन राहून वयोमर्यादा ४७ वर्ष इतकी शिथील करता येईल. |
| ५ | **शिक्षण सेवक प्राथमिक (वर्ग १ ते ४/५)** | मान्यता प्राप्त मंडळाचे किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो) **किंवा**<br>मान्यता प्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्णआणि ४ वर्षाची प्राथमिकशिक्षणातली (B.E l.Ed.) **किंवा**<br>मान्यता प्राप्त मंडळाचे किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्णआणि दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका ( विषेश शिक्षण) परीक्षा उत्तीर्ण राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. **किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परीषदेच्या२००२ च्या तरतुदीनुसार मान्यता प्राप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह उच्च माध्यमिक शिक्षण शास्त्र २ वर्षाची पदविका (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो) **किंवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परीषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एङ परीक्षा उत्तीर्ण.<br>(टिप : जे उमेदवार बी. एङ ही पात्रता पुर्ण करीतअसतील त्यांचा विचार नियुक्ती संदर्भात इयत्ता १ली ते ५ वी च्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून करण्यात येईल. तथापि, त्यांनी सहा महिन्यांचा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचा प्राथमिक शिक्षण शास्त्रातील अभ्यासक्रम Bridge course पुर्ण केलेला असणे बंधनकारक आहे. |
| ६ | **शिक्षण सेवक निम्न श्रेणी माध्यमिक (वर्ग ५)** | मान्यता प्राप्त मंडळाचे किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्णआणि मान्यता प्राप्त संस्थेची दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो) **किंवा**<br>मान्यता प्राप्त मंडळाची किमान५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षाची प्राथमिक शिक्षणातली (B.El.Ed.) **किंवा**<br>मान्यता प्राप्त मंडळाचे किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्णआणि दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका ( विशेष शिक्षण) परीक्षा उत्तीर्ण राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. **किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परीषदेच्या२००२ च्या तरतुदीनुसार मान्यता प्राप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह उच्च माध्यमिक शिक्षण शास्त्र २ वर्षाची पदविका (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो) **किंवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परीषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एङ परीक्षा उत्तीर्ण.<br>(टिप : जे उमेदवार बी. एङ ही पात्रता पुर्ण करीतअसतील त्यांचा विचार नियुक्ती संदर्भात इयत्ता १ली ते ५ वीच्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून करण्यात येईल. तथापि, त्यांनी सहा महिन्यांचा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचा प्राथमिक शिक्षण शास्त्रातील अभ्यासक्रम Bridge course पुर्ण केलेला असणे बंधनकारक आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७ | **शिक्षण सेवक माध्यमिक (विषय - गणित /विज्ञान) (वर्ग ९ ते १०)** | मान्यता प्राप्त विद्यापिठाची गणित/संख्याशास्त्र/भैतिक शास्त्र/रसायनशास्त्र विषयातील पदवी किंवा सामान्य परीक्षा अंतीम वर्षात संबंधीत विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद,मान्यता प्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून ४ वर्षाची पदवी परीक्षा B.A.Ed./Bsc.Ed. (**किंवा** समकक्ष) संबंधीत विषयातून किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण |
| ८ | **शिक्षण सेवक उच्च माध्यमिक (वर्ग ११/१२)** | मान्यता प्राप्त विद्यापिठाची अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA) सह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद,मान्यता प्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA) सह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद,मान्यता प्राप्त संस्थेतून ४ वर्षाची B.A.Ed किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण. |
| ९ | **पशुधन पर्यवेक्षक** | सविंधानिक विद्यापिठाची पशुवैद्यक शास्त्रातील पदवी धारण करीत असलेल्या व्यक्ती, किंवा पशुधन पर्यवेक्षक, पशुपाल, पशुधन सहाय्यक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी (ब -श्रेणी) याबाबतची पशुधन संचालनालयाने दिलेली पुढिल पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणा-या व्यक्ती.<br>१. त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशु वैद्यक पशुपाल प्रशिक्षण अभ्यासक्रम<br>२. पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्यातील विविध संविधीक कृषी विद्यापिठे यांनी चालविलेल्या पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम<br>३. पशु संवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशु वैद्यक व पशु संवर्धन शास्त्रामधिल दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम आणि,<br>४. खालील संस्थानी चालविलेला पशुवैद्यक शास्त्र विषयासह दुग्धशाळा व श्रेत्र व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका यामधिल दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम<br>(एक) महाराष्ट्र तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, किंवा<br>(दोन) राज्यातील विविध संविधीक कृषि विद्यापिठे किंवा<br>(ब) ज्यामुळे नोंदनिकृत पशुवैद्यक व्यावसाइच्या पर्यवेक्षणाखाली व निर्देशनाखाली किरकोळ पशुवैद्यकीय सेवा करण्याचा हक्क असेल अशी, भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करण्याऱ्या व्यक्ती,<br>परंतू किरकोळ पशु वैद्यकिय सेवा करण्याचा त्यांना हक्क मिळवून देणा-या पदविकेचा किंवा प्रमाणपत्राचा धारक, भारतीय पशुवैद्यक परिचर अधिनीयम १९८४ (१९८४ चा ५२ याच्या कलम ३० च्या खंड (ख) च्या परंतूकातील स्पष्टीकरणांन्वये व कलम ५७ अन्वये कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स व्यवसाय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात काढलेल्या क्र.आयविसी.१००६,प्र.क्र.५३२/पदूम.४ दिनांक २७ ऑगष्ट २००९ च्या अधिसुचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किरकोळ पशुवैद्यकीय सेवा देण्यास हक्कदार असेल, आणि<br>(तिन) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडुन वेळोवेळी विहीत केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |

## ३. लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ :

| अ.क्र | पदाचे नाव | लेखी परिक्षेचा दिनांक | लेखी परिक्षेची वेळ |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | |
| १ | ग्रामसेवक (कंत्राटी) | दिनांक ०९.०१.२०२० | सकाळी १०.०० ते ११.३० |
| २ | औषध निर्मान अधिकारी | दिनांक १०.०१.२०२० | सकाळी १०.०० ते ११.३० |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) | दिनांक १०.०१.२०२० | दुपारी २.०० ते ३.३० |
| ४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | दिनांक ११.०१.२०२० | सकाळी १०.०० ते ११.३० |
| ५ | पशुधन पर्यवेक्षक | दिनांक ११.०१.२०२० | दुपारी २.०० ते ३.३० |

**४. प्रश्नपत्रिकेचा दर्जा व गुण :-** उपरोक्त पदाकरिता घेण्यात येणा-या लेखी परिक्षेची गुणसंख्या व त्यात आलेले विषय तथा प्रश्नपत्रिकेचा दर्जा याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संवर्ग | लेखी परिक्षेकरीता गुण | | | | | एकूण गुण | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बुध्दीमापन व गणित | तांत्रिक प्रश्न | | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| १ | ग्रामसेवक कंत्राटी | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | सर्व विषय एच.एस.सी. दर्जाची परिक्षा |
| २ | औषध निर्माता | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | सर्व विषय एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व औषध शास्त्र संबधी प्रश्न |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| ४ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | एस.एस.सी. दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न |
| ५ | पशुधन पर्यवेक्षक | ३० | ३० | ३० | ३० | ८० | २०० | मराठी १२ वी दर्जा,विज्ञान व आरोग्य संबधी प्रश्न पदविका दर्जाची परिक्षा |

सदर्हू जाहिरातीमध्ये दर्शविलेली पदसंख्या बदल होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना जिल्हयात कुठेही पदस्थापना देण्यात येईल. पदस्थापनेबाबत निवड झालेल्या उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेत बदलाबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**५. शिक्षक संवर्गाचे निवड प्रकियेबाबत :**

1. इयत्ता १ ते ४/५ वि च्या पदासाठी अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षेपुर्वी TET (शिक्षक पात्रता परिक्षा) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
2. इयत्ता ९ ते १० वि व इयत्ता ११ ते १२ वि च्या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) दिलेली असणे अनिवार्य आहे.
3. वरील शिक्षण सेवकांची भरती "अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) " यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारावर करण्यात येईल.
4. अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र व परिपुर्ण कागदे सादर केलेल्या उमेदवारांचीच निवड करण्यात येईल.
5. उमेदवारांनी विहीत नमुन्यातच अर्ज सादर करावे. विहीत नमुना जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक) नागपूर येथे उपलब्ध आहे. तसेच **www.nagpur.gov.in** व **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

**६. वयोमर्यादा :** दिनांक **३१.१२.२०१९** रोजी उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी व ४३ पेक्षा जास्त नसावे, खालील नमुद प्रवर्गातील उमेदवारांना शासन तरतुदीनुसार त्यांचेसमोर दर्शविल्याप्रमाणे उच्च वयोमर्यादेत शिथिलता आहे .

| | | |
|---|---|---|
| ६.१ नि:समर्थ उमेदवार (अपंग) | :- | ४५ वर्षापर्यंत |
| ६.२ प्रकल्पग्रस्त , भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी | :- | ४५ वर्षापर्यंत |
| ६.३ माजी सैनिक | :- | शासन निर्णयातील तरतूदीनुसार |
| ६.४ पदवीधर अंशकालीन बेरोजगार कर्मचारी | :- | ५५ वर्षापर्यंत |
| ६.५ खेळाडू | :- | ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिलता राहील. |
| ६.६ जि.प.कर्मचा-यांना | :- | ४५ वर्षापर्यंत |

**७. संगणक हाताळणी/वापरांबाबत :** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक /प्रशासन/२०००/प्र.क्र. ५/२००१/३२, दिनांक २०.०७.२००२ व अनुषंगिक शासन निर्णयान्वये अ.क्र.६ (कंत्राटी ग्रामसेवक) वगळून उर्वरित पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापरांबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

अ) D.O.E.C.C.सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा**

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

**८.** उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. ( अधीवास प्रमाणपत्र मुळ दस्ताऐवज पडताळणी दरम्यान सादर करावे . )

**९.** उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**१०.** प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

**११.** उमेदवारांनी एक पासपोर्ट साईज फोटो त्यावर मागे स्वत:चे नाव व स्वाक्षरी करुन अर्जासोबत सादर करावा.

**१२. परिक्षा शुल्क :-** परिक्षेकरीता **उमेदवारांनी रुपये २५० /-** इतके परिक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर (Chief Executive Officer,Z.P.Nagpur) या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) ची माहिती अर्जात नमुद सदर मुळ धनाकर्ष अर्जासोबत सादर करावा

**१३. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क भरण्याची अट लागू नाही.**

**१४.** लेखी परिक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी परीक्षा झाल्यानंतर जिल्हा परिषद, नागपूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

**१५.** शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अन्य आवश्यक अर्हता तसेच जातीचा दाखला, निःसमर्थ/भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती व मुळ दस्ताऐवज पडताळणी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे . साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी पोस्टमास्तर व मुख्याध्यापक याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अपूर्ण दस्ताऐवज समजून उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**१६. उमेदवारांनी मुळ दस्ताऐवज पडताळणी दरम्यान खालील प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

१६.१) अर्जाची प्रत

१६.२) शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र

१६.३) शैक्षणिक अहर्तेचे प्रमाणपत्र (गुण पत्रिका) १०वी / १२वी / पदवीधर

१६.४) पदास आवश्यक असलेले प्रमाणपत्र

१६.५) वयासंबंधी दाखला (जन्माचा दाखला /शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

१६.६) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र

१६.७) अधिवास प्रमाणपत्र (एस.डी.ओ./उप जिल्हाधिकारी यांनी दिलेले )

१६.८) निःसमर्थ /भुकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त /माजी सैनिक /अंशकालीन बेरोजगार कर्मचारी /१९९१ चे जणगणना कर्मचारी / स्वातंत्र्य संग्राम सैनिकांचे पाल्य बाबत प्रमाणपत्र

१६.९) अनुभव प्रमाणपत्र :- संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांकासह स्पष्ट स्वरुपात असावे.

१६.१०) खेळाडूचे प्रमाणपत्र

१६.११) शासकीय / निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र, निवड झालेल्या उमेदवारांनी मुळ दस्ताऐवज पडताळणी दरम्यान उक्त प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती दिल्या जाणार नाही

१६.१२) सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र.

**१७.** उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे /एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय /जिल्हा सैनिक कार्यालय व प्रकल्पग्रस्तांनी जिल्हा पुनर्वसन कार्यालय) येथे नोंदवले असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

**१८.** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रिधो/२००२/प्र.क्र. ६८/क्रियूसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी याची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलता राहील.

**१९.** सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र/विकाक २२१५/प्रक्र.३३७/१६ अ दिनांक ०४ नोव्हेंबर २०१६ अन्वये भुकंपग्रस्ताचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाही तर ती पदे प्रकल्पग्रस्त उमेदवारामधून भरण्यात येईल आणि अशा उमेदवारांकडे प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

**२०.** कार्यासन अधिकारी महाराष्ट्र ग्राम विकास विभा गाचे पत्र क्रमांक संकीर्ण २०१८/प्रक्र२४१ आस्था ८ दिनांक २१ जानेवारी २०१९ अन्वये औषध निर्माण अधिकारी व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या तांत्रिक संवर्गातील पदांच्या परीक्षेचे माध्यम "तांत्रिक भाग इंग्रजी व उर्वरित भाग मराठी" याप्रमाणे राहील. (शासन परिपत्रक क्र/एपिटी२०१४/१३९/आस्था-८, दिनांक ५ जुन २०१४ सोबतचे परिशिष्ट -अ प्रमाणे)

**२१.** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्र.अ.क्र. १००५/प्र.क्र. ३६/०५/१६ - अ दिनांक २६.०५.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. ( अविवाहित उमेदवारांनी सुध्दा लागू नाही असे नमूद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. )

**२२.** एखाद्या उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**२३.** अपंगाचे आरक्षणाबाबत शासन निर्णय दि. २९.०५.२०१९ नुसार अपंग उमेदवाराची निवड प्रक्रीया करण्यात येईल.

**२४.** उमेदवारांना लेखी परिक्षेस स्वखर्चाने हजर राहावे लागेल. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल अथवा भरती रद्दझाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवले आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२५. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दस्ताऐवज पडताळणी दरम्यान सादर केलेली माहीती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२६. या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधीन असेल.

२७. उमेदवाराने अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणत्र सादर करणे अनिवार्य राहील. व तसेच चारीत्र्य पडताळणी अहवाल वैध प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल. चारित्र पडताळणी अहवाल अवैध असल्यास निवड रद् करण्यात येईल.

२८. जिल्हा परिषद, नागपूरच्या नोटीस बोर्डावर, **www.nagpur.gov.in** व **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर व लेखी परीक्षेच्या रोजी दिलेल्या सुचनानुसार, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येईल. पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुळ दस्ताऐवज तपासणी करीता स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य राहील. मुळ दस्ताऐवजाची तपासणी केल्यानंतर मुळ दस्ताऐवज योग्य आढळल्यास उमेदवारास निवडीस पात्र ठरविण्यात येईल.मुळ दस्ताऐवज तपासणी करीता उमेदवार अनुपस्थित राहील्यास उमेदवारी रद्य करण्यात येईल.याबाबत लेखी सुचना पाठविण्यात येणार नाही. याबाबत नंतर कोणत्याच तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

२९. नियुक्त होणा-या उमेदवारांना परिभाषिक अशंदान निवृत्तीवेतन लागू राहील.

३०. अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छानणी शिवाय परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. (शिक्षक संवर्गाचे पदे वगळुन) त्यामुळे उमेदवार परिक्षा पास झाला तरी आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परिक्षा पास झाल्यामुळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही .त्यामुळे उमेदवाराने संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासुनच अर्ज करावा .

३१. भरती प्रक्रियेसंबधी देण्यात येणाऱ्या सुधारीत व अद्यावत सुचना जिल्हा परिषद, नागपूरच्या नोटीस बोर्डावर व **www.nagpur.gov.in** व **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी स्वतःहून याबाबतची माहिती वेळोवेळी प्राप्त करुन घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** | **स्वा/-** |
| **(प्रमिला जाखलेकर)** | **(अंकुश केदार)** | **(रविंद्र ठाकरे)** |
| **सदस्य सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |
| **जिल्हा निवड समिती, नागपुर** | **जिल्हा निवड समिती, नागपुर** | **जिल्हा निवड समिती, नागपुर** |
| **तथा अती. मुख्य कार्यकारी अधिकारी** | **तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **तथा जिल्हाधिकारी** |
| **जिल्हा परिषद, नागपूर** | **जिल्हा परिषद, नागपूर** | **नागपुर** |